SBI भारतीय स्टेट बँक State Bank of India

शाखा पत्ता– केव्हीएम कॅमेलिया, प्लॉट क्र. ३४, सेक्टर ४, करंजाडे, तालुका पनवेल, रायगड ४१०२०६

तारण सोन्याची विक्री

खालील नमूद कर्जदारांनी त्यांचे सोने **एसबीआय करंजाडे शाखा** कर्ज खाते चुकते करण्यास कसूर केल्यामुळे **"जे आहे जेथे आहे तत्त्वाने"** खालील तपशिलानुसार तारण सोन्याच्या लिलावामार्फत तारण **तारण सोने** विक्रीसाठी मोहरबंद बोली मागविण्यात येत आहे. मोहोरबंद बोली **२४.०७.२०२६** रोजी किंवा पूर्वी **दु. २.०० वा.** पर्यंत वरील शाखा पत्त्यावर जमा करायच्या आहेत.

कर्जदाराचे नाव	दागिने	निव्वळ वजन	राखीव किंमत
प्रशांत गणेश मराठे	१ हार + २ स्टड	११.९० ग्रॅम	रु. १,३५,६६०.००/–

संपर्क क्रमांक : ८८८८०७९२४९

बोली या बोलीदारांच्या उपस्थितीत वरील शाखेच्या पत्त्यावर २४.०७.२०२६ रोजी **दु. ३.०० वा.** उघडण्यात येतील आणि तेथे एकापेक्षा जास्त बोली प्राप्त झाल्यास आपापसामध्ये बोली लावण्यात येतील. लिलावाच्या तारखेला कोणत्याही वॉक इन बोलीदारांना सुध्दा स्वीकृती असेल. बँकेने कोणत्याही वेळी बोली स्वीकारणे/नाकारण्याचा/रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

दिनांक : १६.०७.२०२६, ठिकाणः पनवेल **प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

शुध्दीपत्रक

दै. नवशक्ती गुरुवार दि. ०४.०६.२०२६ रोजी "जाहिर नोटीस" या मथळ्याखाली आमची नोटीस आपले मार्फत प्रसिध्द झाली होती. त्यामध्ये "आमचे अशिल श्रीमती कांचन भरत मेस्त्री गोखिवरे, वसई (पू) ता. वसई, जि. पालघर. यांचा मुलगा कु. सुहास भरत मेस्त्री व त्याची पत्नी सौ. रिटा सुहास मेस्त्री व त्याची दोन मुले कु. मयुरेश, कु. जतिन हे सन २००१ पासुन बेपत्ता आहेत." असे अनवधानाने टंकलिखित झालेले आहेत. मात्र ते " सन २००१" नसुन ते " सन २००७" असे वाचणात यावे. म्हणून दिली नोटीस.

ॲड. अंजली रा. पाटील

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की (१) दिलीप डी. दुदानी आणि (२) हनी दिलीप दुदानी (**''सभासद''**) हे रॉयल्स अकॉर्ड को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदींनुसार नोंदणीकृत असलेली एक सहकारी गृहनिर्माण संस्था, जिचा नोंदणी क्र. बीओएम/एचएसजी/२७७४ सन १९७१ असा आहे (**''सोसायटी''**) आणि जिचे नोंदणीकृत कार्यालयः प्लॉट क्र. ४४३, १३ वा आणि १४ वा रस्ता यांचा कोपरा, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२ येथे आहे, यांचे सभासद आहेत आणि सभासद म्हणून ते दिनांक २३ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र.०३ (**''शेअर प्रमाणपत्र''**) अंतर्गत समाविष्ट असलेल्या विभिन्न क्र. ११ ते १५ (दोन्हींच्या समावेशासह) च्या प्रत्येकी रुपये ५०/– (रुपये पन्नास फक्त) च्या पूर्णपणे भरणा केलेल्या ५ (पाच) शेअर्सचे (**''शेअर्स''**) धारक आहेत.

सदर शेअर्सच्या संबंधातील सदर मूळ शेअर प्रमाणपत्र हरवलेले आहे, गहाळ झालेले आहे आणि ते सदर सभासदांना सापडण्याजोगे नाही. सभासदांनी सोसायटीकडे सदर शेअर्सच्या संबंधातील प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरिता अर्ज केलेला आहे.

मूळ शेअर प्रमाणपत्र कब्जामध्ये असल्याचा दावा करणाऱ्या किंवा सदर शेअर प्रमाणपत्राच्या आणि/किंवा सदर शेअर्सच्या संबंधात कोणताही अधिकार, मालकीहक्क, हितसंबंध, धारणाधिकार, आकार, दावा किंवा आक्षेप असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहिरातीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत मूळ शेअर प्रमाणपत्र परत करावे आणि/किंवा त्यास पाठींबा देणाऱ्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये अशा प्रकारचा दावा किंवा आक्षेप सादर करावा.

जर उपरोक्त कालावधीमधे कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त झाला नाही तर, मूळ शेअर प्रमाणपत्र कायमचे हरवले आहे किंवा गहाळ झाले आहे आणि त्याबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा किंवा आक्षेप नाही, असे गृहीत धरण्यात येईल. त्यानंतर सोसायटी कोणत्याही व्यक्तीचा आणखी कोणताही उल्लेख न करता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदींनुसार, त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमावलीनुसार आणि सोसायटीच्या पोट-नियमानुसार सभासदांना प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही करतील. त्यानंतर सोसायटीच्या विरुद्ध प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्याचा अधित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि दावा करणारी व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीला केवळ सदस्यांविरुद्धच दाद मागता येईल.

यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट

रॉयल्स अकॉर्ड को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड यांनी जारी केलेल्या दिनांक २३ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या शेअर प्रमाणपत्र क्र. ०३ अनुसार समाविष्ट असलेल्या विभिन्न क्र. ११ ते १५ (दोन्हींच्या समावेशासह) चे प्रत्येकी रुपये ५०/– (रुपये पन्नास फक्त) चे पूर्णपणे भरणा केलेले ५ (पाच) शेअर्स.

आज दिनांक १७ जुलै, २०२६

करीता,

मानसेवी सचिव/अध्यक्ष,

रॉयल्स अकॉर्ड को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड,

प्लॉट क्र. ४४३, १३वा आणि १४वा रस्ता यांचा कोपरा,

खार (पश्चिम) - मुंबई ४०० ०५२.

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

ठाकुरद्वार शाखाः नाना शंकरशेठ स्मृती, जेएसएस रोड, चिरा बाजार बस स्टॉप, मुंबई ४००००२, फोनः ०२२–४३३४९६५०/५६/६५ ईमेलः Thakur@Bankofbaroda.com

ठिकाणः मुंबई, दिनांकः ०१.०७.२०२६

कर्जदारांना सूचना

(सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोट कलम (२) अन्वये)

प्रति,

मे. ओमेगा ओव्हरसीज
संपूर्ण तळ मजला, १९१ ईएफ, करणसिंग गोविंद बिल्डिंग, कावेल, ९ वी लेन, डॉ. वेगास स्ट्रीट, मुंबई, महाराष्ट्र ४००००२

मे. ओमेगा ओव्हरसीज
ऑफिस क्र. ५०५, ५ वा मजला, आदमजी बिल्डिंग, नरसी नाथा स्ट्रीट, मस्जिद, मुंबई, महाराष्ट्र ४००००३

मे. ओमेगा ओव्हरसीज
झेड, कॉमन वेअरहाऊस, एपीएमसी, दाणे बंदर, वाशी, नवी मुंबई ४००००९.

सौ. एल्सी वर्गीस कल्लारक्कल
फ्लॅट क्र. २१०१, २१ वा मजला, विंग ए, शेलाजी ॲव्हेन्यूज बिल्डिंग, ५ वी आणि ६ वी कामाठीपुरा लेन, ई वॉर्ड, मुंबई ४००००८

सौ. एल्सी वर्गीस कल्लारक्कल
फ्लॅट क्र. १०२, बी–२, शिव व्हॅली सीएचएस, गोदरेज हिल रोड, शनी मंदिराजवळ, कल्याण (पश्चिम), ठाणे, महाराष्ट्र ४२१३०१

संदर्भः सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना, ज्याला यापुढे ॲक्ट म्हटले जाईल. खाते– मे. ओमेगा ओव्हरसीज प्रॉपर्टी: सौ. एल्सी वर्गीस कल्लारक्कल

माननीय महोदय,

संदर्भः आमच्या ठाकूरद्वार शाखेतील क्रेडिट सुविधा

१. आम्ही ०२.०८.२०२५ च्या पत्र क्रमांक ठाकूर/एडीव्ही/२०२५–२६/सीसी/०१ चा संदर्भ घेतो ज्यामध्ये विविध क्रेडिट सुविधांना मंजुरी आणि मंजुरीच्या अटींचा समावेश आहे. वरील मंजुरीनुसार, तुम्ही पुढे सांगितल्याप्रमाणे, त्यासाठी सुरक्षा प्रदान केल्यानंतर क्रेडिट सुविधांचा लाभ घेतला आहे आणि त्यांचा वापर सुरू केला आहे. विविध कर्ज/क्रेडिट सुविधा खात्यांमधील सध्याची थकबाकी आणि अशा दायित्वासाठी तयार केलेले सुरक्षा हितसंबंध खालीलप्रमाणे आहेत:

सुविधेचे स्वरूप आणि प्रकार	मर्यादा रु. मध्ये	व्याज दर	(वरील नमून तारखेरोजी थकबाकी, वरील नमून तारखेरोजी लागू न केलेले आणि सेवा न केलेले व्याज समाविष्ट करून आणि कायदेशीर शुल्क असल्यास ते वगळून)	सिक्युरिटीजच्या संक्षिप्त वर्णनासह सुरक्षा करार (कृपया सुरक्षा करारांचे तपशील आणि एकूण क्षेत्रफळ आणि सीमांसह गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे तपशील नमूद करा) मालमत्तेचे गहाणखतः
कॅश क्रेडिट (०४१८०५०००००३११)	३,००,००,०००/–	१०.१०%	रु. ३,०५,३७,०८२.२६/– ३०.०६.२०२६ रोजीस	गहाण मिळकतः सौ. एल्सी वर्गीस कल्लारक्कल यांच्या मालकीची, गाव भायखळा विभाग येथे स्थित, ५ वी व ६ वी कामाठीपुरा लेन, ई वॉर्ड, मुंबई ४००००८ येथील शेलाजी ॲव्हेन्यूज बिल्डिंग, विंग ए, २१ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २१०१ यावर समन्यायी गहाण.
कार कर्ज (०३९८०६००००१९६५)	६,९५,०००/–	९.२५%	रु. ५,१३,६६३.९४/– ०१.०७.२०२६ रोजीस	–
वैयक्तिक कर्ज (०४०५०६००००१९१२)	१५,००,०००/–	१३.२५%	रु. १२,४५,२३३.४८/– ०१.०७.२०२६ रोजीस	–
एकूण	३,०२,१९५,०००/–		रु. ३,२२,९५,९७९.६८/–	–

२. २९.०५.२०२६ रोजीच्या कॅश क्रेडिटसाठीच्या कर्जाच्या पावती पत्रात तुम्ही बँकेला तुमचे **रु. ३,००,००,०००/–** चे दायित्व कबूल केले आहे.

३. तुम्हाला माहिती आहेच की, **३०.०६.२०२६** रोजी संपलेल्या तिमाहीसाठी तुम्ही वरील कर्जे/थकबाकीवरील व्याज भरण्यात चूक केली आहे. **३०.०४.२०२६** रोजी आणि त्यानंतर देय असलेल्या कॅश क्रेडिटचे हप्ते/व्याज भरण्यातही तुम्ही चूक केली आहे.

४. तुमच्याकडून झालेल्या चुकांमुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशांनुसार आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, तुमचे मुदत कर्ज खाते **२१.०६.२०२६** रोजी अनुत्पादक मालमत्ता म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. आमच्या वारंवार विनंत्या आणि मागण्या असूनही, तुम्ही थकीत कर्जे व्याजासह परतफेड केलेली नाही.

५. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या विविध सिक्युरिटीजद्वारे योग्यरित्या सुरक्षित केलेल्या क्रेडिट सुविधांबाबत तुमच्या दायित्वांची पूर्तता करण्यास तुम्ही असमर्थ आहात आणि तुमच्या खात्याचे नॉन–परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण केल्याबद्दल, आम्ही तुम्हाला येथे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या उप–कलम (२) अंतर्गत सूचना देत आहोत आणि तुम्हाला या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, **रु. ३,२२,९५,९७९.६८/– (रुपये तीन करोड बावीस लाख पंच्याण्णव हजार नऊशे एकोणऐंशी आणि अडुसष्ट पैसे) (थकीत समाविष्ट न लावलेले व्याज आणि कायदेशीर प्रभार काही असल्यास)** बँकेला तुमचे दायित्व पूर्ण भरण्याचे आणि पूर्ण करण्याचे आवाहन करतो. आम्ही तुम्हाला पुढे सूचना देतो की जर तुम्ही देयकाच्या तारखेपर्यंत वरील रक्कम व्याजासह भरली नाही, तर आम्ही सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास मोकळे राहू, जे कृपया लक्षात ठेवा.

६. कृपया लक्षात घ्या की, प्रत्येक कर्ज सुविधेसाठी पूर्ण पैसे भरेपर्यंत, वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या दरांनुसार व्याज लागत राहील.

७. आम्ही तुमचे लक्ष सदर कायद्याच्या कलम १३ चे उप कलम १३ कडे वेधू इच्छितो, ज्यानुसार तुम्हाला आमची पूर्व लेखी संमती घेतल्याशिवाय, उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही सुरक्षित मालमत्तेची विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही मार्गाने (व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त) हस्तांतरण करण्यास मनाई आहे. आम्ही हे नमूद करू इच्छितो की, उक्त कायद्याच्या कलम १३(१३) मध्ये नमूद केलेल्या उपरोक्त तरतुदीचे पालन न करणे, हा कायद्याच्या कलम २९ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हा आहे.

८. आम्ही तुमचे लक्ष सदर कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) कडे वेधू इच्छितो, ज्यानुसार, जर तुम्ही बँकेने केलेल्या सर्व खर्च, शुल्क आणि व्ययांसह देय असलेली रक्कम सार्वजनिक लिलावासाठी/कोटेशन्स मागवण्यासाठी/निविदा/खाजगी करारासाठी सूचना प्रसिद्ध करण्याच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी अदा केली, तर तुम्ही तारण ठेवलेल्या मालमत्तांची पूर्तता करू शकता. कृपया नोंद घ्यावी की, उपरोक्त सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर, तारण ठेवलेली मालमत्ता सोडवून घेण्याचा तुमचा अधिकार उपलब्ध राहणार नाही.

कृपया लक्षात घ्या की ही मागणी सूचना आमच्याकडे असलेल्या इतर कोणत्याही हक्कांवर किंवा उपायांवर कोणताही प्रतिकूल परिणाम करणार नाही आणि आमच्यावर देय असलेल्या रकमेच्या संदर्भात पुढील मागण्या करण्याच्या हक्कासह, परंतु इतकेच मर्यादित नाही, अशा कोणत्याही हक्कांचा त्याग मानली जाणार नाही.

आपले विश्वासू,
(सुरुची सागर)
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

IDFC FIRST Bank

(पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड एकत्रित सह आयडीएफसी बँक लिमिटेड आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड नावे ज्ञात)
सीआयएनः एल६५११०टीएन२०१४पीएलसी०९७७९२.
नोंदणीकृत कार्यालय : केआरएम टॉवर्स, ८वा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई–६०००३१.
दू. : +९१ ४४ ४५६४ ४००० । फॅक्स : +९१ ४४ ४५६४ ४०२२

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह–कर्जदार यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड सह एकत्रित आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड अशी ज्ञात)** कडून खालील नमूद तारण कर्जे प्राप्त केली. खालील नमूद कर्जदार आणि सह–कर्जदार यांची कर्जे ही त्यांच्या संबंधित मिळकतींच्या गहाणाद्वारे तारण केली आहेत. ते संबंधित कर्ज करार यांच्या अटी आणि शर्ती यांचे पालन करण्यात कसूरवार ठरले आणि अनियमित बनले, त्यांची कर्जे ही आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आली. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड सह एकत्रित आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड अशी ज्ञात)** ला त्यांच्याद्वारे देय थकबाकी रक्कम ही खालील कोष्टकात अधिक विशेषतः जारी केलेल्या संबंधित सूचनेत नमूद केलेली आहे आणि सदर रकमेवरील पुढील व्याज सुद्धा लागू आहे आणि ते त्यांच्या संबंधित तारखेपासून परिणामांसह सांपार्श्विक दराने प्रभारित असेल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जाचा प्रकार	कर्जदार आणि सह–कर्जदारांचे नाव	कलम १३(२) सूचनेची तारीख	कलम १३(२) सूचनेनुसार थकीत रक्कम
१	१०६३७७६६६	गृह कर्ज	१. प्रितम विश्वनाथ लाड २. वसुधा विश्वनाथ लाड	१०.०६.२०२६	भारु. २६,८८,८६५.१७/–

मिळकतीचा पत्ता: फ्लॅट क्र. ३०४, सी विंगमध्ये, तिसरा मजला, मोजमापीत क्षेत्र ४५३.९२ चौ. फूट (बांधकाम क्षेत्र), लक्ष्मी धुळे कॉम्प्लेक्स नावाच्या संकुलातील 'लक्ष्मी निवास' नावाच्या इमारतीमध्ये, लक्ष्मी धुळे कॉम्प्लेक्स विंग ए, बी आणि सी को–ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये, सर्व्हे क्र. २१७/१८६, गट क्र. ३ए, गाव अचोळे, आंबेडकर नगर, अचोळे, नालासोपारा (पूर्व), तालुका वसई, उप–नोंदणी जिल्हा वसई, जिल्हा पालघर, महाराष्ट्र–४०१२०९ येथे स्थित मिळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग.

तुम्हाला याद्वारे सदर प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांत इतर दर, आकार इ. आणि त्यांच्या संबंधित तारखेपासूनचे त्यावरील व्याजाच्या सांपार्श्विक दरासह वरील कोष्टकात तपशिलवार दर्शविल्यानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडसह एकत्रित आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड अशी ज्ञात)** ला थकीत रक्कम देय करण्यासाठी बोलाविले आहे, कसूर केल्यास निम्नस्वाक्षरीकार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड सह एकत्रित आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड अशी ज्ञात)** च्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी वरील नमूद गहाण मिळकतींच्या विरोधात सरफैसी ॲक्टच्या कलम १३(४) आणि कलम १४ अन्वये कारवाई करण्यासाठी प्रतिबंधित असेल. पुढे तुम्हांला सदर तारण मत्तेची विक्री/भाडेपट्टा किंवा अन्यद्वारे हस्तांतरणासाठी सदर ॲक्टच्या कलम १३(१३) अन्वये मज्जाव असेल.

सही/–
प्राधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड सह एकत्रित आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड अशी ज्ञात)

दिनांक : १७.०७.२०२६
ठिकाण : पालघर, महाराष्ट्र

अनेक्चर -१३
फॉर्म क्रमांक २२
[नियम ३७(१) पहा]
सर्व परवानगीयोग्य मोडद्वारे

वसुली अधिकारी कार्यालय

वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी 3)

1ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्चेंज बिल्डींग, सेक्टर -30 ए, वाशी, नवी मुंबई - 400703

आरपी नं. २०४/२०२४ लिलाव विक्री दिनांक - २१.०८.२०२६

विक्री घोषणा : अचल मालमत्ता

आयकर कायदा १९६१ च्या व्दितीय अनुसूचीच्या नियम ३७,३८ आणि ५२(१) (२) अंतर्गत विक्रीची घोषणा वाचा बँक, कर्ज आणि दिवाळखोरी कायदा १९९३ झालेल्या कर्जाची वसुली

पंजाब नॅशानल बँक
विरुध्द
श्री. तुकाराम मुरलीधर ढबाळे आणि इतर

प्रति,
(सिडी-१) श्री. तुकाराम मुरलीधर ढबाळे
(सिडी-२) श्री. नाना मुरलीधर ढबाळे
(सिडी-३) श्री. भाऊसाहेब संपतराव ढबाळे
वरील सर्व राहणार - चांदुशी पो. मातोरी, ता. नाशिक, जि. नाशिक, महाराष्ट्र-४२२००१
(सिडी-४) श्री. बाळकृष्ण नामदेव कताड
राहणार - पो. गंगापूर, पेठ गल्ली, ता. नाशिक, जि. नाशिक, महाराष्ट्र-४२२००१

१.जसे की, वसुली प्रमाणपत्र क्रमांक आरसी क्रमांक **२०४/२०२४, ओए नं. ६५६/२०९** मध्ये पिठासीन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी३)यांनी वसुलीकरीता **रुपये ६३,९०,५६९.००/- (अक्षरी त्रेसष्ठ लाख नव्वद हजार पाचशे एकोणसत्तर फक्त)** सीडी(एस) यांना संयुक्तपणे आणि स्वातंत्रपणे आदेश केला होता परंतु सीडी(एस) हे प्रमाणपत्रधारक बँकेची थकबाकी भरण्यास अयशस्वी ठरले आहे.आणि जसे की खालील स्वाक्षरीदाराने सदरील वसुली प्रमाणपत्राच्या खालील अनुसुचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जदाराच्या गहाण / जोडलेल्या मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिलेला आहे.

२. यादवारे सूचित करण्यात येते की, लिलाव पुढे ढकलण्याबाबतचा कोणताही आदेश नसल्यास, सदर मालमत्तेची/मालमत्तांची विक्री **२१.०८.२०२६ रोजी दुपारी १.०० ते २.००** या वेळेत लिलावाद्वारे केली जाईल आणि ही बोली प्रक्रिया **https://www.bankauctions.com या संकेतस्थळावरून 'ऑनलाइन' पद्धतीने पार पडेल. लिलाव सेवा पुरवठादाराच्या अधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे: नाव - C1 INDIA Pvt. Ltd., श्री. भाविक पंड्या; मोबाईल क्रमांक-८८६६६८२९३७; ई-मेल - maharashtra@c1india.com.**
हेल्पलाइन क्रमांक-९१-१२४-४३०२०२०/२१/२२/२३/२४; ई-मेल - support@bankeauctions.com

३. लिलाव सेवा प्रदात्यासाठी अधिकृत बँक अधिकाऱ्याचा तपशील - **श्री. सजील कुमार पी., मो. ८४९९९७१९२१ ई-मेल : cs8288@pnb.bank.in**

४. खालील शेडयुलमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादीच्या / सीडी यांच्या मालमत्तेशी संलग्नीत दायित्वे आणि दावे हे खालील निर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील. शेडयुलमध्ये नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेची विक्री करण्यात येईल. त्या प्रत्येक लॉटच्या विरुध्द शेडयूलमध्ये निर्दिष्ट केल्या आहेत. मालमत्तेच्या काही भागाची विक्री वसुल करावयाची रक्कमेस समाधानी असल्यास उर्वरीत भागाची विक्री त्वरीत थांबविण्यात येईल. या प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी अधिक व्याज अधिक खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणताही लॉट ठेवण्यापुर्वी विक्री देखील थांबविण्यात येईल.

५. ही मालमत्ता **"जिथे आहे तशी"** आणि **"जशी आहे तशी"** या तत्त्वावर विकली जात आहे.

६. ही मालमत्ता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या लॉटनुसार विक्रीसाठी ठेवली जाईल. जर मालमत्तेच्या केवळ एका भागाच्या विक्रीतून अपेक्षित रक्कम वसूल झाली, तर उर्वरित भागाची विक्री त्वरित थांबवली जाईल. तसेच, एखादा लॉट अंतिमरीत्या विकला जाण्यापूर्वी (बोली स्वीकारली जाण्यापूर्वी), जर संबंधित प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी, त्यावरील व्याज आणि खर्च (विक्रीच्या खर्चासह) विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याकडे जमा केले गेले, किंवा ती रक्कम स्वाक्षरीकर्त्याकडे भरली गेल्याचा समाधानकारक पुरावा सादर केला गेला, तर विक्री थांबवली जाईल.

७. या विक्रीप्रसंगी, सामान्य जनतेला स्वतः किंवा योग्यरित्या अधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत बोली लावण्याचे आमंत्रण दिले जाते. तथापि, विक्रीशी संबंधित कोणतेही कर्तव्य बजावणारा अधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती, विक्री केल्या जाणाऱ्या मालमत्तेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे बोली लावू शकत नाही, तसेच त्या मालमत्तेतील कोणताही हितसंबंध संपादन करु शकत नाही किंवा संपादन करण्याचा प्रयत्नही करु शकत नाही.

८. ही विक्री 'आयकर कायदा, १९६१' च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये विहित केलेल्या अटी व त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या, तसेच खालील अतिरिक्त अटींच्या अधीन असेल:-

९. सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले तपशील खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याच्या माहितीनुसार दिले आहेत; तथापि, या जाहीरनाम्यातील कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा माहितीच्या अभावासाठी खाली सही करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.

१०. मालमत्ता ज्या किमान किमतीपेक्षा कमी किमतीला विकली जाणार नाही, ती किंमत अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

११. बोलीची रक्कम ज्या पटीत वाढवली जाईल ती रक्कम; बोलीची रक्कम किंवा बोलीदार यांच्याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास, संबंधित लॉट (मालमत्ता) त्वरित पुन्हा लिलावासाठी ठेवला जाईल किंवा लिलाव रद्द केला जाऊ शकतो.

१२. सर्वाधिक बोली लावणाऱ्यास संबंधित लॉटचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, परंतु अट अशी की, तो/ती बोली लावण्यासाठी कायदेशीररित्या पात्र असावा/असावी आणि त्याने/तिने लावलेली बोलीची रक्कम 'राखीव किमती'पेक्षा कमी नसावी. जर प्रस्तावित किंमत स्पष्टपणे अत्यंत अपुरी वाटत असेल आणि ती स्वीकारणे अयोग्य ठरेल असे वाटत असेल, तर सर्वाधिक बोली स्वीकारण्यास नकार देण्याचा अधिकार खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याचा असेल.

१३. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक बोलीदाराने **'RECOVERY OFFICER, DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT3)' यांच्या नावे 'डिमांड ड्राफ्ट' किंवा 'पे ऑर्डर'द्वारे 'अनामत रक्कम' भरुन ती 'रिकव्हरी ऑफिसर' यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. 'DEBTS RECOVERY TRIBUNAL MUMBAI (DRT III)' च्या नावे किंवा RTGS/NEFT द्वारे थेट 'UNION BANK OF INDIA' च्या खाते क्र. 062711010000195 (IFSC कोड: UBIN0806277)** मध्ये रक्कम जमा करुन; तसेच मालमत्तेच्या लिलावाचा अर्ज, पॅन कार्डची प्रत, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्राचा पुरावा, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक आणि कंपनीच्या बाबतीत कंपनीचे प्रतिनिधित्व/अधिकार दर्शवणारे दस्तऐवज व जमा केलेल्या रकमेची पावती/काउंटर फॉइल अपलोड करावी.

14. सदर डीडी (DD) / पे-ऑर्डर किंवा RTGS/NEFT द्वारे केलेल्या पेमेंटचा मूळ पुरावा; यासोबतच योग्यरित्या भरलेला लिलाव बोली अर्ज ओळखपत्राची (मतदार ओळखपत्र/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट - ज्यावर भविष्यातील पत्रव्यवहारासाठीचा पत्ता नमूद असावा) स्वयं-साक्षांकित प्रत, पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत आणि रद्द केलेला चेक हे सर्व 'रिकव्हरी ऑफिसर, DRT-III' यांच्या कार्यालयात **19.08.2026 रोजी सायंकाळी 4.30** वाजेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेली (बयाणा रक्कम) किंवा चा मूळ पुरावा विचारात घेतला जाणार नाही.

15. इच्छुक बोलीदारांना सल्ला दिला जातो की त्यांनी मालमत्तेची मालकी आणि त्यावर काही बोजा असल्यास त्याबाबत योग्य ती चौकशी करुन स्वतःची खात्री करुन घ्यावी

ईएमडी, आरक्षीत रक्कम आणि बोली वाढीव रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे

लॉट नं.	मालमत्तेचे विवरण	ईएमडी रक्कम रुपये	आरक्षित रक्कम रुपये	वाढीव रक्कम रुपये मल्टिपल प्रमाणे
1	कृषी जमीन, गट नं. १२९, एरिया क्षेत्रफळ ४ हे .२३ आर, नळेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक. **चतुःर्सिमा खालील प्रमाणे** **पुर्व -** गट नं. १२८, **पश्चिम -** गट नं.१२९ मधील नामदेव काकड यांचा हिस्सा **उत्तर-** गट नं.११३ आणि ११०, **दक्षिण -** गट नं. १३ आणि १३३	१२,२०,०००/-	१,२२,००,०००/-	५०,०००.००

16. विहित मुदत आणि वेळेनंतर प्राप्त झालेली EMD (बयाणा रक्कम) नाकारली जाईल आणि 'ई-लिलाव अर्जात' संबंधित व्यक्तीने दिलेल्या पर्यायानुसार ती रक्कम त्यांना परत केली जाईल. एकदा बोली सादर केल्यानंतर, बोलीदाराने ई-लिलाव पोर्टलवर लॉग-इन करुन लिलाव प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य आहे; तसे न केल्यास आणि तसे करणे योग्य वाटल्यास, स्वाक्षरीकर्त्यादवारे त्यांची EMD सरकारजमा केली जाऊ शकते. लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्रिय ई-मेल आयडी आणि इंटरनेट कनेक्शनसह संगणक प्रणाली उपलब्ध असणे ही पूर्णपणे बोलीदाराची जबाबदारी असेल. ऑनलाइन बोली प्रक्रियेदरम्यान कनेक्टिव्हिटीबाबत (संपर्क जोडणीबाबत) उद्भवणाऱ्या कोणत्याही समस्येसाठी बोलीदार स्वतःच जबाबदार असेल आणि यासंदर्भात कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही.

17. जर लिलावाच्या विहित वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली वाढवली गेली, तर इतर बोलीदारांना त्यांच्या बोली वाढवण्याची संधी देण्यासाठी लिलावाची वेळ आणखी ५ मिनिटांनी वाढवली जाईल; आणि जर या वाढीव ५ मिनिटांच्या कालावधीत कोणतीही वाढ केली गेली नाही, तर लिलाव प्रक्रिया समाप्त होईल. जंगम/स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी किंवा विक्री घेणाऱ्या अधिकाऱ्याने निर्देश दिल्याप्रमाणे त्यानंतर त्वरित भरली जाणे आवश्यक आहे; आणि रक्कम भरण्यात कसूर झाल्यास, ती मालमत्ता त्वरित पुनर्विक्रीसाठी पुन्हा लिलावात काढली जाईल.

18. यशस्वी बोलीदाराने, बोली स्वीकारली गेल्यानंतर (लिलाव जिंकल्यानंतर), EMD ची रक्कम समायोजित करुन उर्वरित रक्कम (एकूण विक्री रकमेपैकी २५%) दुसऱ्या दिवशी संबंधित खात्यात जमा करणे किंवा डिमांड ड्राफ्ट/बँकर्स चेक/पे ऑर्डरद्वारे भरणे आवश्यक आहे (वर नमूद केलेल्या तपशिलानुसार). जर तो दिवस सुट्टीचा किंवा रविवार असेल, तर त्यानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी ही रक्कम भरावी लागेल.

19. खरेदीदाराने विक्रीच्या रकमेपैकी उर्वरित ७५% रक्कम मालमत्ता विक्रीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत (विक्रीचा दिवस वगळून) जमा करणे आवश्यक आहे; किंवा जर १५ वा दिवस रविवार किंवा इतर सुट्टीचा दिवस असेल, तर १५ व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी वर नमूद केलेल्या विहित पद्धतीने ती रक्कम जमा करावी लागेल. याव्यतिरिक्त, खरेदीदाराने 'रिकव्हरी ऑफिसर, डेट्स रिकव्हरी ट्रिब्युनल, मुंबई (DRT3)' यांच्याकडे 'पाउंडेज फी' देखील जमा करणे आवश्यक आहे; ही फी १,००० रुपयांपर्यंतच्या रकमेवर २% आणि त्यापुढील रकमेवर १% या दराने आकारली जाईल. 'रजिस्ट्रार, डेट्स रिकव्हरी ट्रिब्युनल, मुंबई (DRT3)' यांच्या नावे काढलेल्या डीडी (DD) द्वारे १,०००/-रुपये.

२०. विहित मुदतीत रक्कम भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीचा खर्च वजा केल्यानंतर, खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्यास योग्य वाटल्यास ती अनामत रक्कम सरकारजमा (जप्त) केली जाईल; तसेच, कसूर करणाऱ्या खरेदीदाराचा त्या मालमत्तेवर किंवा ती मालमत्ता नंतर ज्या रकमेस विकली जाईल त्या रकमेच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क राहणार नाही. विक्रीची नवीन घोषणा प्रसिद्ध करुन ती मालमत्ता पुन्हा विकली जाईल.

२१. 'रिकव्हरी ऑफिसर, डेट्स रिकव्हरी ट्रिब्युनल, मुंबई (DRT3)' यांच्याकडून विक्रीची पुष्टी होईपर्यंत, सर्वोच्च बोली लावणाऱ्या व्यक्तीचा त्या मालमत्तेवर कोणताही हक्क किंवा मालकी राहणार नाही.

22. अयशस्वी बोलीदारांनी जमा केलेली EMD जर ती ऑनलाइन पद्धतीने जमा केली असेल, तर ऑनलाइनच परत केली जाईल. जर EMD ही DD / BC / Pay Order च्या स्वरुपात जमा केली असेल, तर ती प्रत्यक्ष (हाताने) परत केली जाईल. ई-लिलाव EMD अर्जासोबत ज्या ओळखपत्राची प्रत जोडली होती, त्याचे मूळ प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. EMD रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

23. ई-लिलाव EMD अर्जामध्ये नमूद केलेल्या व्यक्तींशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव विक्री प्रमाणपत्रात समाविष्ट करण्याबाबत किंवा बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

24. विक्रीसाठी एकापेक्षा जास्त मालमत्ता असल्यास, अशा मालमत्तांची विक्री सोयीनुसार केली जाईल; विक्री सूचनेत नमूद केल्याप्रमाणे अनुक्रमे (एकापाठोपाठ एक) विक्री करणे बंधनकारक नाही.

25. अनिवासी भारतीय बोलीदारांनी त्यांच्या पासपोर्टच्या फोटो असलेल्या पृष्ठाची प्रत जोडणे अनिवार्य आहे आणि त्यांची बोली भारतीय दूतावासाद्वारे प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे. ही जंगम/स्थावर मालमत्ता "जशी आहे तशी" या तत्त्वावर विकली जात आहे आणि ती नियमांनुसार प्रसिद्धी खर्च, महसूल आणि इतर बोजांच्या अधीन असेल. अवाजवी वाटल्यास कोणत्याही किंवा सर्व बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, अथवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी लिलाव पुढे ढकलण्याचा अधिकार खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने राखून ठेवला आहे.

विक्रीच्या या जाहीरनाम्याचा तपशील www.drt.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

ईएमडी, आरक्षीत रक्कम आणि बोली वाढीव रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे

लॉट नं.	मालमत्तेचे विवरण	मालमत्तेवर किंवा तिच्या भागावर मुल्यमापन केलेला महसूल	मालमत्तेवर असलेला कोणताही बोझा	मालमत्तेवर असलेले कोणतेही दावे ते जर मालमत्तेवर ठेवण्यात
1	कृषी जमीन, गट नं. १२९, एरिया क्षेत्रफळ ४ हे .२३ आर, नळेगाव, ता. दिंडोरी, जि. नाशिक. **चतुःर्सिमा खालील प्रमाणे** **पुर्व -** गट नं. १२८, **पश्चिम -** गट नं.१२९ मधील नामदेव काकड यांचा हिस्सा, **उत्तर-** गट नं.११३ आणि ११०, **दक्षिण -** गट नं. १३ आणि १३३	माहित नाही	माहित नाही	माहित नाही

टिप - लिलावाची दिनांक २१/०८/२०२६,
एकुण थकीत रक्कम रु. १,३८,७८,३७७.२७/- प्रमाणपत्र कर्जाव्दारे देय आहे.
खालील मालमत्ता तपासणी दिनांक - १७/०८/२०२६, सकाळी ११ ते दुपारी ४.०० च्या दरम्यान
निविदा प्राप्त करण्याची शेवटीची दिनांक - १९/०८/२०२६ दु. ४.३० पर्यंत

शिक्का

दि. १५ जुलै २०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने आणि शिक्कानिशी दिले

स्वाक्षरीत/-
(मुकेश चंद मिना)
वसुली अधिकारी - I, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)

टीप : स्वैर भाषांतर ; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

कार्यकारी अभियंता (सी–२ विभाग) कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, १०–१२, रोपालेन, चंदनवाडी, मरीन लाईन्स (पुर्व), मुंबई – ४०० ००२.
दुरध्वनी क्रमांक : ०२२–२२०५ ४२ ३५ **ई–मेल : rreec2mhada@gmail.com**

म्हाडा MHADA

निविदा सूचना

कार्यकारी अभियंता, सी–२ विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या कामांकरीता महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे उप जिल्हा निबंधक/ मुंबई जिल्हा (शहर) यांचेकडे नोंदणीकृत मजुर संस्था/सोसायटीकडून योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी–१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यात येत आहे.

अनु. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम (रुपये)	इसारा रक्कम (रुपये)	सुरक्षा अनामत (रुपये) [५०% रक्कम सुरुवातीस व नंतर ५०% रक्कम देयकातून]	कोऱ्या निविदेची रक्कम अधिक मुल्यवर्धित कर/ विना परतावा (रुपये)	कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ	कोऱ्या निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ	काम करावयाचा कालावधी	ठेकेदाराचा नोंदणी वर्ग
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	विशेष दुरुस्ती पुर्नरचित इमारत अक्षय, सदभावना, वाल्मिकि निवास, पंचवटी, विजया कॉटेज कापरेश्वर कृपा या इमारतींच्या परिसरातील सर्व गाळे व दुकाने परिसराची साफसफाईची सर्व कामे सी–२ विभागाच्या अंतर्गत (मंडळ निधीचे काम)	९,३४,९२०/–	–	५,०००/–	५९०/–	**२१.०७.२०२६ ते ०४.०८.२०२६** सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत	**०५/०८/२०२६ व ०६/०८/२०२६** सकाळी १०.०० वाजल्यापासून दुपारी १.०० वाजेपर्यंत	१२ महिने [पावसाळ्या सहित]	वर्ग–ब व त्यावरील

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यूनतम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघडल्याचा दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय न्यूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करून त्यांनी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मंजूर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सूचना पहावी.

२. कोऱ्या निविदा म्हाडा/मुं.म.पा./सा.बां. विभाग/कें.सा.बां.वि/रेल्वे/बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणापत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.

३ म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नांव समाविष्ट नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.

४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (लागू असल्यास) रु. ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले मुळ प्रतीत सादर करावे. सदर मुळ प्रतिज्ञापत्रे निविदा नोटीस कालावधिमधील असणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर मुळ प्रतिज्ञापत्रामध्ये निविदाकाराने स्वतःचे नाव, कंपनीचे नाव व सोबत ज्या इमारतीच्या कामाची निविदा भरणार आहे त्या इमारतीचे नाव व निविदा बोली क्रमांक नमुद करणे अत्यावश्यक आहे. सर्व निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

५. निविदाकारांना शासन निर्णय क्र. संकिर्ण–२०२४/प्र.क्र.०८/गृनिभू, दिनांक १४/०२/२०२४ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता (सी–२ विभाग)/ मुं.इ.दु. व पु. मंडळ,१०–१२, रोपा लेन, चंदनवाडी, मुंबई–४०० ००२ यांचेकडून रकाना क्र. ७ मध्ये विहित केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा या कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्वीकृती केली जाईल व मोहोरबंद निविदा दि. ०७/०८/२०२६ सकाळी ११.३० वाजता कार्यकारी अभियंता (सी–२ विभाग)/ मुं. इ. दु. व पु. मंडळ यांचे कार्यालयात उघडण्यात येईल.

७. संयुक्तबोलीदाराची बोली स्वीकारली जाणार नाही.

८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.

९. निविदा स्विकृती दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.

१०. भाडेकरु/रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुर्नविकासासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी देकारपत्र/आदेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानी बद्दल हक्क किंवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

११. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०–२१ च्या एसएसआरवर आधारीत असून, त्यामध्ये जी. एस. टी. अंतर्भुत नाही. जी. एस. टी. अदागयी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल.

१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

१३. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. मुं. अ./निकाअ/न.क्र४८/९२३१/दुवपु–२०२२ दिनांक ९/१२/२०२२ च्या अटी सदर निविदेस लागू राहतील.

सही/–
(महेश जाधव)
कार्यकारी अभियंता, (सी–२ विभाग),
मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई

Follow us: @mhadaofficial

म्हाडा–गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
CPRO/A/544

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

GRIHUM HOUSING FINANCE Apna Ghar. Apni Pehchan.

(पूर्वी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, बी बिल्डिंग, गंगा ट्रुनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र ४११०१४. शाखा कार्यालय युनिटः शिवकला आर्केड, १ ला मजला, शिवकला आर्केड, तारापूर रोड, बोईसर, मुंबई, महाराष्ट्र–४०१५०१.

ई–लिलाव– विक्री सूचना

सरफैसी अधिनियम अंतर्गत तारण स्थावर मत्तेची विक्री

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रशन ऑफ फायनान्शियल ॲसेट अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''कायदा'') सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स २००२ चा नियम ८ आणि ९ अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्रीकरीता विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार/सह–कर्जदार/गहाणदार/जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकती गृहम् हाऊसिंग फायनान्स लिमिटेड **(पूर्वी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जात होती. १७ नोव्हेंबर २०२३ पासून पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे नाव बदलून गृहम् हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करण्यात आले असून, त्यापूर्वी मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जात होती आणि मूळतः जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनी या नावाने निगमित करण्यात आली होती) (यापुढे कायद्यानुसार ''तारण धनको'' म्हणून संबोधले जाईल)** यांच्याकडे गहाण ठेवलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांचा ताबा, तारण धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत दिलेल्या सूचनेनुसार, कायद्याच्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमांच्या नियम ८ आणि ९ सह वाचन करून घेतला आहे.

तारण मालमत्तांची विक्री **''जशी आहे तशी'', ''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत'' आणि जे काही आहे ते'' या तत्त्वावर १८.०८.२०२६ रोजी** ई–लिलावाद्वारे केली जाईल. सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, आम्ही **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटवर दिलेल्या ई–लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जाहीर लिलाव आयोजित करणार आहोत. **विक्रीच्या सविस्तर नियम आणि शर्तींसाठी, कृपया जीएचएफएल/तारण धनकोच्या www.grihumhousing.com** या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना तारीख आणि थकबाकीची रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मिळकतीचे वर्णन (डी)	राखीव रक्कम (ई)	इअर (आरपी च्या १०%) (एफ)	इअर सादरीकरण तारीख (जी)	बोली वाढ रक्कम (एच)	मिळकतीच्या तपासणी तारीख आणि वेळ (आय)	लिलावाची तारीख आणि वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरणे असल्यास (के)
१	**कर्ज खाते क्र. एचएल००४९११००००००५०३५४६१ आश्विनी अरविंद गुरव (कर्जदार) अरविंद शांताराम गुरव (सह–कर्जदार)**	**सूचना तारीखः ०९–०४–२०२६ एकूण थकबाकी: रु. ८,३२,०४६/–** (रु. आठ लाख बत्तीस हजार सेहेचाळीस फक्त) ०९–०४–२०२६ रोजी देय असून त्यावर वसुली होईपर्यंत वार्षिक १२.२% दराने व्याज लागू राहील.	प्रत्यक्ष	धारक मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग : फ्लॅट क्र. ४११, चौथा मजला, क्षेत्र मोजमापीत १८८.३२ चौ. फूट म्हणजेच १७.५० चौ. मीटर चटई क्षेत्र, ''ॲम्ब्रोसिया १५'' या निवासी प्रकल्पामध्ये (मंजूर आराखड्यानुसार इमारत क्र. १, टाइप–ए), गट क्र. ८३१/१९/बी (जुना सर्व्हे क्र. ८३१/१९ भाग) असलेल्या बिगरशेती जमिनीवर बांधलेली, गाव माहीम, तालुका–जिल्हा पालघर येथे स्थित.	रु. ६,३६,१६०/– (रु. सहा लाख छत्तीस हजार एकशे साठ फक्त)	रु. ६३,६१६/– (रु. त्रेसष्ट हजार सहाशे सोळा फक्त)	**१७.०८.२०२६ सायं ५ पर्यंत**	१०,०००/–	**१०.०८.२०२६ (स. ११ – दु. ४)**	**१८.०८.२०२६ (स. ११ – दु. २)**	शून्य
२	**कर्ज खाते क्र. एचएम०२३५एच१८१०००४३ मदुरा राऊत (कर्जदार) संगीता सुहास राऊत (सह–कर्जदार)**	**सूचना तारीखः ०९–०३–२०२६ एकूण थकबाकी: रु. १३,०३,३७६/–** (रु. तेरा लाख तीन हजार तीनशे शहात्तर फक्त) ०९–०३–२०२६ रोजी देय असून त्यावर वसुली होईपर्यंत वार्षिक १३.८५% दराने व्याज लागू राहील.	प्रत्यक्ष	धारक मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग : फ्लॅट क्र. ३०३, क्षेत्र मोजमापीत ५१० चौ. फूट, ''मदर वैलंकन्नी अपार्टमेंट'' या इमारतीमध्ये, प्लॉट क्र. १२६/१, २, ३, २३, ७१२, ८९१ असलेल्या मिळकतीवर बांधलेली, गाव गोखीवरे, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे स्थित (यापुढे संक्षिप्ततेसाठी ''सदर मिळकत'' म्हणून संबोधण्यात येईल).	रु. ११,२०,८७५/– (रु. अकरा लाख वीस हजार आठशे पंच्याहत्तर फक्त)	रु. १,१२,०८७.५०/– (रु. एक लाख बारा हजार सत्याऐंशी आणि पन्नास पैसे फक्त)	**१७.०८.२०२६ सायं ५ पर्यंत**	१०,०००/–	**१०.०८.२०२६ (स. ११ – दु. ४)**	**१८.०८.२०२६ (स. ११ – दु. २)**	शून्य
३	**कर्ज खाते क्र. एचएम०४५८एच१८१०००९० राजशेखर कनप्पा अमीन (कर्जदार) अनिता राजशेखर अमीन (सह–कर्जदार)**	**सूचना तारीखः ०८–०९–२०२४ एकूण थकबाकी: रु. २२,६६,३३७/–** (रु. बावीस लाख सहासष्ट हजार तीनशे सदतीस फक्त) ०८–०९–२०२४ रोजी देय असून त्यावर वसुली होईपर्यंत वार्षिक १४% दराने व्याज लागू राहील.	प्रत्यक्ष	धारक मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग : फ्लॅट क्र. ३०६, क्षेत्र मोजमापीत २६.६५० चौ. मीटर एकूण चटई क्षेत्र, तिसरा मजला, बी विंग, ''शुष्टी प्रारंभ'' या संकुलामध्ये, गट क्र. ५/३/३, एकूण क्षेत्र मोजमापीत ० एच, २९ आर, ० पी पी.के. ओएच–क्यू४आर–क्यूपी, एलवायआय१जी असलेल्या जमिनीवर बांधलेली, गाव बेलवली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित. (सदर मिळकत) आणि निष्पादित विक्रीखतामध्ये विशेषतः नमूद केल्याप्रमाणे सीमांकित.	रु. २०,५२,७५०/– (रु. वीस लाख बावन्न हजार सातशे पन्नास फक्त)	रु. २,०५,२७५/– (रु. दोन लाख पाच हजार दोनशे पंच्याहत्तर फक्त)	**१७.०८.२०२६ सायं ५ पर्यंत**	१०,०००/–	**१०.०८.२०२६ (स. ११ – दु. ४)**	**१८.०८.२०२६ (स. ११ – दु. २)**	शून्य

इच्छुक बोली लावणाऱ्यांना/खरेदीदारांना तारण धनकोच्या शाखेला आणि लिलावाच्या मालमत्तांना भेट देण्याचा, स्वतः चौकशी करण्याचा आणि अतिरिक्त शुल्क, बोजा आणि कोणत्याही तृतीय–पक्षीय हितांची खात्री करून घेण्याचा आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घेण्याचा सल्ला दिला जातो. मालमत्तेशी संबंधित मालमत्ता कर, वीज/पाणी देयके आणि इतर कोणतीही देयके, जर असतील तर, यशस्वी बोली लावणाऱ्याने निश्चित करून भरायची आहेत.

इच्छुक बोली लावणाऱ्यांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आणि ई–बिडिंगसाठी अनिवार्य असलेला लॉगिन आयडी आणि पासवर्ड, लिलाव सेवा प्रदाता सी१ इंडिया प्रा.लि. यांच्याकडून आगाऊ मिळवणे आवश्यक आहे. पत्ता– प्लॉट क्रमांक–६८, तिसरा मजला, गुडगाव, हरियाणा–१२२००३. हेल्पलाइन क्रमांक–७२९१९८११२४,२५,२६. सपोर्ट ईमेल आयडी Support@bankeauctions.com. **संपर्क व्यक्ती – धरणी पी, ईमेल आयडी– dharani.p@c1india.com संपर्क क्रमांक– ९९४८१८२२२२.** कृपया लक्षात घ्या की, इच्छुक बोलीदार त्यांच्याकडूनच ई–लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. उद्देशित खरेदीदार/बोलीदार यांनी ''इसारा अनामत रक्कम (ईएमडी)''ची रक्कम एनईएफटी/आरटीजीएस/डीडी द्वारे ''गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ऑक्शन प्रोसीड्स ए/सी'' या खात्यात जमा करणे आवश्यक आहे. बँक आयसीआयसीआय बँक लिमिटेड, खाते क्रमांक–०९१५५१०००२८ आणि आयएफएससी कोड–आयसीआयसी०००९१५, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, पंचशील टेक पार्क, गणपती चौकाजवळ, ४३/४४ विमान नगर ४११०१४, कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेतून, स्तंभ मध्ये नमूद केल्याप्रमाणे किंवा **१७.०८.२०२६ पूर्वी जमा करणे आवश्यक आहे. तसेच https://www.bankeauctions.com या संकेतस्थळावर आपले नाव नोंदणी करून विनामूल्य युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा आणि सेवा प्रदात्याकडून ई–ऑक्शनचे प्रशिक्षण घ्यावे. संकेतस्थळावर नोंदणी झाल्यानंतर, उद्देशित खरेदीदार/बोलीदार यांनी खालील कागदपत्रांच्या प्रती अपलोड करणे, ई–मेल करणे तसेच स्वतः साक्षांकित हार्ड कॉपी खालील पत्त्यावर पाठविणे आवश्यक आहे : शिवकला आर्केड, १ ला मजला, शिवकला आर्केड, तारापूर रोड, बोईसर, मुंबई, महाराष्ट्र – ४०१५०१, मोबाईल क्र. +९१ ८२८११३८१४३, ई–मेल आयडी : p.adith@grihumhousing.com अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी आणि ई–ऑक्शनमध्ये सहभागी होण्यासाठी कृपया https://www.bankeauctions.com आणि www.grihumhousing.com या संकेतस्थळांना भेट द्यावी.**

ही सूचना कर्जदार/सह–कर्जदार/तारणदार/जामीनदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम–२००२ च्या नियम ८(६) अंतर्गत ३० दिवसांची (तीस) नोटीस म्हणून देखील मानली जावी.

कोणत्याही परिस्थितीत स्थानिक भाषेतील प्रकाशन आणि इंग्रजी वृत्तपत्र प्रकाशनातील मजकुरात काही फरक असल्यास, फ्री प्रेस जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या इंग्रजी वृत्तपत्र भाषेतील मजकुराला प्राधान्य दिले जाईल.

तारीख : १६.०७.२०२६ ठिकाणः मुंबई **सही/– प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (याआधी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि. नावे)**

The spirit of Mumbai is now 97 years old!

THE FREE PRESS JOURNAL

www.freepressjournal.in